मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :३६ | रविवार दि.०७ डिसेंबर ते शनिवार १३ डिसेंबर २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय — संचालकांबाबतची संदिग्धता...
पान ३ — मूळव्याध आणि गुदाशयाचा कॅन्सर ..
पान ४ — अर्नाळयात अवैध हातभट्टीवर धाड!

### रमाबाई अपार्टमेंट दुर्घटनेप्रकरणी सहाय्यक आयुक्तांना अटक;

# १० डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी



नालासोपारा, प्रतिनिधी — विरार पूर्व येथील विजयनगर परिसरातील रमाबाई अपार्टमेंट कोसळून १७ जणांचा बळी गेलेल्या भीषण दुर्घटनेप्रकरणी मनपा प्रभाग सी चे सहाय्यक आयुक्त गिल्सन गोन्सालिवस यांना अखेर गुरुवारी रात्री अटक करण्यात आली. बेकायदेशीर व धोकादायक इमारतीविरोधात मुदतीत कारवाई न करणे, तसेच एमआरटीपी कायद्यानुसार गुन्हा नोंद न करणे या निष्काळजीपणाचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.२६ ऑगस्ट २०२५ रोजी ४ मजली रमाबाई अपार्टमेंट कोसळून १७ जणांचा मृत्यू झाला होता, तर ९ जण जखमी झाले होते. काही वर्षांपूर्वीच बांधलेली ही इमारत जीर्ण झाल्याचे निष्पन्न झाले होते. विकासकाने रहिवाशांची दिशाभूल करून इमारत अधिकृत असल्याचा भास निर्माण केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.दुर्घटनेनंतर पोलिसांनी बांधकाम व्यावसायिक, जागा मालक यांच्यासह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. तपासाची जबाबदारी गुन्हे शाखा युनिट-३कडे देण्यात आली होती. युनिटने विकासक व अन्य आरोपींना अटक पान नं.२वर

## वसई प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालशाहीचा सुळसुळाट?

### ‘अधिकारी काम करतात की दलाल?’ — नागरिकांचा संतप्त सवाल

वसई प्रतिनिधी:वसई येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरु असलेली अनियमितता, दलालांचा वावर आणि माहिती अधिकार कायद्याकडे दुर्लक्ष या मुद्द्यांवरून नागरिक आणि सामाजिक संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या कार्यालयात ‘प्रशासनापेक्षा दलालच जास्त प्रभावी’ असल्याची चर्चा सर्वसामान्यांमध्ये रंगली आहे.

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की RTO कार्यालयात कामकाज पूर्णपणे दलालांवर अवलंबून झाले आहे.परवाना, नोंदणी, अथवा वाहन तपासणीसाठी येणाऱ्या नागरिकांना थेट अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणे कठीण झाले आहे.‘दलालच दस्तऐवज हाताळतात, तर मग अधिकाऱ्यांची भूमिका काय?’

असा सरळ सवाल नागरिक करत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कार्यालयातील सार्वजनिक माहिती अधिकारी आणि प्रथम अपील अधिकारी यांनी माहिती अधिकार RTI अंतर्गत आलेल्या अर्जांकडे दुर्लक्ष केल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

काही अर्जांना निर्धारित कालावधीत उत्तर न दिल्यामुळे माहिती लपविण्याचा प्रकार असल्याची शंका नागरिक व्यक्त करत आहेत.

‘माहिती अधिकार कायदा हा पारदर्शकतेचा आधार आहे,

पण वसई RTO मध्ये त्यालाच गभीरतेने घेतले जात नाही,’

असे एका सामाजिक कार्यकर्त्याने सांगितले. पान नं.२वर





### आचोळयात पालिकेची धाड;

# ९ टन प्रतिबंधित प्लास्टिक जप्त



नालासोपारा : वसई–विरार महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ‘डी’तर्फे शुक्रवारी सकाळी आचोळे परिसरात मोठी कारवाई करण्यात आली. सहाय्यक आयुक्त जितेंद्र नाईक यांच्या पथकाने साडी कंपाऊंड, नालासोपारा (पू.) येथे असलेल्या एका गोडावूनवर धाड टाकून ९ टनांपेक्षा अधिक प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा जप्त केला. पालिकेच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी जप्ती असल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली.कारवाईची माहिती मिळताच आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी व अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी थेट घटनास्थळी जाऊन पाहणी केली. संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देत कारवाई जलदगतीने पार पाडण्यात आली. दरम्यान, नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधितांवर ५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याचे पालिकेने सांगितले.राज्यात प्रतिबंधित प्लास्टिक उत्पादन, साठवण, वितरण, विक्री किंवा वापर आढळल्यास प्रथम गुन्ह्यास ५ हजार, दुसऱ्यांदा १० हजार तर तिसऱ्यांदा २५ हजार रुपयांचा दंड आणि तीन महिन्यांपर्यंतच्या कारावासाची तरतूद आहे. व्यापाऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे पान नं.२वर

# संपादकीय...!

## संचालकांबाबतची संदिग्धता.

नागरी सहकारी बँकांच्या संचालकपदाबाबतचे कायदे, त्यातील दुरुस्त्या असे होऊनही त्यांच्या कालावधीबाबत संदिग्धताच दिसते. ही संदिग्धता दूर होणे गरजेचे आहे.बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता आहे.कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल□यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे.बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? 'पूर्ण वेळ संचालक' ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते.महाराष्ट्र सरकारने सन १९६९मध्ये राज्याच्या सहकार कायद्यात सुधारणा करून कोणत्याही संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु 'सलग' या शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत 'सलग' शब्दाऐवजी 'एकूण' असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली!केंद्र सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याचा अनुभव विचारात घेणे आवश्यक होते, असे गमतीने म्हणावेसे वाटते. कारण सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी १९६९मध्ये दहा वर्षांच्या कार्यकाळाबाबत कलम ७३-अ मध्ये दुरुस्ती करताना सहकार खात्याने अनेक शक्यतांचा विचार करून, कायदा वाचताना कोठेही शंकेला वाव मिळणार नाही, याची खबरदारी घेतली होती.१) कलम ७३-अ नंतर खाली दिलेल्या खुलाशात १० वर्षांची मुदत मोजताना सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीचा कालावधी विचारात घ्यावयाचा नाही, असे स्पष्ट नमूद केले होते. २) कायद्यातील पळवाट शोधून सरकारच्या हेतूला हरताळ फासला जाऊ नये, म्हणून याच कलम ७३-अ च्या खाली खुलासा क्र.२ मध्ये असे नमूद केले होते की, १० वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी मागील १२ महिन्यांत पदाधिकाऱ्याने राजीनामा दिल्यास, त्याने १० वर्षांचा कालावधी पूर्ण केला, असे मानण्यात येईल. ३) याच कलमानंतर खुलाशामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले होते, की अशा व्यक्तीस १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्या समितीचा एक कालावधी (सध्या पाच वर्षे) संपेपर्यंत पुन्हा निवडणुकीस उभे राहता येणार नाही. म्हणजे पाच वर्षांच्या खंडानंतर ती व्यक्ती पुन्हा पुढील दहा वर्षांच्या कालावधीसाठी संचालक होऊ शकत होती.बँकिंग नियमन कायद्यामधील नवीन तरतुदींनुसार मात्र संबंधित व्यक्तीने संचालक म्हणून सलग १० वर्षांचा कालावधी एकदा जरी पूर्ण केला तरी त्यास त्या संस्थेवर आयुष्यभरात पुन्हा कधीही संचालक होता येणार नाही. बँकिंग नियमन कायद्यातील नवीन दुरुस्ती वाचताना, त्यामध्ये 'सलग १० वर्षे' हा उल्लेख केल्याने एक ऑगस्ट २०२५ नंतर होणाऱ्या निवडणुकींद्वारे प्रथम निवडून येणारे संचालक १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच राजीनामा देतील व थोड्या कालावधीनंतर निवडणुकीद्वारे पुनश्च निवडून येतील व तहहयात संचालक राहू शकतील. परंतु संबंधित कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी, सलग दहा वर्षांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या संचालकांना एक ऑगस्ट २०२५ नंतर नवीन तरतुदींनुसार त्या संस्थेचे कधीच पदाधिकारी होता येणार नाही. राज्यस्तरीय नागरी सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर त्या त्या राज्यांत स्थापन झालेल्या निवडणूक प्राधिकरण ांचे नियंत्रण असते. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँकेच्या कायद्यातील तरतुदींच्या आधारे स्वतःच्या कायद्यात बदल न करता, निवडणूक प्राधिकरण एखाद्या उमेदवारास अपात्र ठरविण्याचे धाडस करेल? कारण २०२१ नंतर झालेल्या निवडणुकांसाठी बँकिंग नियमन कायद्यात त्या वेळी आठ वर्षांची तरतूद असतानाही राज्य निवडणूक प्राधिकरणाने एकाही उमेदवारास अपात्र ठरविलेले नाही.नागरी सहकारी बँकांच्या निवडणुकीसाठी राज्याच्या सहकार कायद्यात त्या-त्या राज्य सरकारांनी बदल करणे आवश्यक आहे, की बँकिंग नियमन कायद्यातील संबंधित तरतुदीचे पालन करणे सहकार आयुक्तांना बंधनकारक राहील, या संदर्भात स्पष्टता येणे आवश्यक आहे. जर एखाद्या राज्याने संचालकांच्या कालावधीची कायद्यातील तरतूद विचारात न घेता नागरी सहकारी बँकांच्या निवडणुका घेतल्या तर रिझर्व्ह बँक काय करील? ९७व्या घटना दुरुस्तीत सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाचा कालावधी पाच वर्षे नमूद केला आहे. सन २०२०मधील दुरुस्तीनुसार संचालकांचा सलग कालावधी आठ वर्षे करण्यात आला होता. मात्र ९७व्या घटना दुरुस्तीशी जुळवून घेण्यासाठी तो १० वर्षे करण्यात आला. ९७व्या घटना दुरुस्तीमधील कलम २४३ झेड जे (२०) मध्ये प्रत्येक राज्यांने घटनेतील तरतुदींनुसार राज्याच्या कायद्यामध्ये सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत, असे नमूद करत ही जबाबदारी राज्यांवर सोपवली आहे. तसेच याच कलमातील उपकलम ३५ मध्ये बँकिंग व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांसाठी बँकिंग नियमन कायद्याच्या तरतुदीसुद्धा लागू होतील, असा स्पष्ट उल्लेख आहे. या सर्वांचा एकत्रित विचार करून राज्य सरकारांनी बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी योग्य ते निणय घेणे आवश्यक आहे.

## रमाबाई अपार्टमेंट दुर्घटनेप्रकरणी...पान नं.१

केल्यानंतर चौकशीदरम्यान मनपा अधिकाऱ्यांची निष्काळजीपणा भूमिकाही समोर आली. सहाय्यक आयुक्त गोन्सालिस यांनी धोकादायक घोषित इमारत तत्काळ रिकामी न करणे आणि विकासकाविरुद्ध आवश्यक गुन्हा नोंदविण्याची कारवाई न केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला.गुन्हे शाखा युनिट-३च्या पथकाने गुरुवारी रात्री दीडच्या सुमारास गोन्सालिस यांना अटक केली. त्यांनी न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता; मात्र तो फेटाळण्यात आला. शुक्रवारी त्यांना वसई न्यायालयात हजर करण्यात आले असता १० डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे, अशी माहिती गुन्हे शाखा युनिट-३चे पोलिस निरीक्षक शाहुराज रणवरे यांनी दिली.

## वसई प्रादेशिक परिवहन कार्यालयात... पान नं.१

या कार्यालयात कार्यरत असलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी ओळखपत्र ID कार्ड परिधान न केल्याचे नागरिकांच्या लक्षात आले आहे.त्यामुळे 'कोण अधिकारी आणि कोण दलाल' हे समजणेच कठीण झाले आहे.हे चित्र शासकीय कार्यालयाच्या सुरक्षिततेवर आणि पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचे नागरिकांचे मत आहे.नागरिक आणि सामाजिक संघटनांनी या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.त्यांनी परिवहन मंत्री आणि विभागीय आयुक्त यांनी या भ्रष्टाचाराविरोधात तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.'RTO कार्यालय हे नागरिकांसाठी सेवा केंद्र आहे,पण ते दलालांसाठी कमाईचे ठिकाण बनले,हे प्रशासनासाठी लज्जास्पद आहे,'असा नागरिकांचा संताप व्यक्त होत आहेवसई प्रादेशिक परिवहन कार्यालय हे परिसरातील हजारो नागरिकांसाठी आवश्यक सेवा देणारे केंद्र आहे.

मात्र, दलालशाही, अनियमितता आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे या कार्यालयावरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होत आहे.प्रशासनाने जर योग्य वेळी कारवाई केली नाही, तर RTO म्हणजे दलालांचे कार्यालय' असा ठपका कायम राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## आचोळयात पालिकेची धाड;... पान नं.१

प्रतिबंधित प्लास्टिक खरेदी–विक्री करू नये, तसेच नागरिकांनीही अशा प्लास्टिकचा वापर टाळावा, असे आवाहन महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

## दहा वर्षांची गाडी समजणार 'जुनी'; फिटनेस फी दहापट वाढली!

नालासोपारा : देशातील वाढते वायुप्रदूषण रोखण्यासाठी केंद्र सरकारने मोटार वाहन कायद्यात मोठे बदल करत फिटनेस शुल्कात तब्बल दहापट वाढ केली आहे. आतापर्यंत १५ वर्षांनंतर घेण्यात येणारी फिटनेस चाचणी आता वाहन दहा वर्षांचे होताच अनिवार्य करण्यात आली आहे. वाहन जसे वयोमानात वाढेल तसे फिटनेस शुल्कही टप्प्याटप्प्याने वाढणार आहे.केंद्रीय परिवहन मंत्रालयाने सुधारित नियम अधिसूचित केले असून, फिटनेस चाचणीला पर्यावरणपूरक धोरणाशी जोडण्यात आले आहे. नव्या तरतुदीनुसार वाहनांचे वय १० ते १५ वर्षे, १५ ते २० वर्षे आणि २० वर्षांपेक्षा अधिक असे तीन गट करण्यात आले आहेत. प्रत्येक गटात फिटनेस शुल्क मागील टप्प्यापेक्षा जास्त आकारले जाणार आहे.पूर्वी केवळ १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांसाठी फिटनेस अनिवार्य होते. मात्र नव्या तरतुदींनुसार दहा वर्षांचे पूर्ण होताच फिटनेस घेणे बंधनकारक ठरणार आहे. यामुळे खासगी व व्यावसायिक वाहनांचा मोठा वर्ग या नियमांच्या चौकटीत आला आहे. जिल्ह्यातील दहा वर्षांच्या वाहनांची संख्या मोठी असल्याने अनेक वाहनमालकांना नव्या फिटनेस वेळापत्रकाला सामोरे जावे लागणार आहे.२,५०० वरून थेट २५ हजारांपर्यंत उडी मालवाहू आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी सर्वाधिक वाढ करण्यात आली आहे. ज्या वाहनांसाठी आधी २,५०० रुपये शुल्क लागत होते, ते आता २५,००० रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आले आहे. ट्रक, बस आणि इतर व्यावसायिक वाहनमालकांकडून या वाढीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. 'जुनी, प्रदूषणकारी वाहने रस्त्यावरून कमी होतील' 'प्रदूषण नियंत्रण आणि रस्ते सुरक्षितता लक्षात घेऊन वाहनांचे वयोमान कमी करण्यात आले आहे. दहा वर्षांवरील वाहनांसाठी फिटनेस अनिवार्य केल्याने नियमबाह्य, प्रदूषणकारी आणि धोकादायक वाहने रस्त्यावरून हटतील,'— अतुल आदे, प्रादेशिक परिवहन अधिकारी वयोमानानुसार टप्प्याटप्प्याने जास्त शुल्क नव्या मापदंडानुसार दहा वर्षांवरील वाहनांना किमान शुल्क आकारले जाईल. १५, २० किंवा त्याहून अधिक वर्षांचे वाहन असल्यास प्रत्येक टप्प्याला शुल्क वाढत जाणार आहे. त्यामुळे जुन्या वाहनांवर आर्थिकदृष्ट्या अधिक भार पडणार आहे.कोणकोणत्या वाहनांसाठी नियम लागू? सुधारित नियम पुढील सर्व वाहनांना लागू होत आहेत — दुचाकी चारचाकी खासगी वाहन ऑटो रिक्षा, टॅक्सी व कमर्शियल कार मालवाहतूक वाहने (LCV, HCV) एस.टी. बस, प्रवासी बस प्रदूषण नियंत्रण आणि रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने हे नियम पाळणे बंधनकारक असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.










# मूळव्याध आणि गुदाशयाचा कॅन्सर यामध्ये काय फरक आहे? दोन्हींबद्दल महत्त्वाची माहिती

गेल्या तीस ते चाळीस वर्षांमध्ये आपल्या सर्वांच्या जीवनशैलीमध्ये बराच फरक पडलेला आहे. एकेकाळी चालणे, हालचाल असलेली आणि कमी प्रक्रिया केलेले अन्न यांचा समावेश असलेली जीवनशैली या दशकांमध्ये वेगानं बदलली.

रोजची कामं या काळात सोपी झाली, यंत्रांची, मोबाईल-कॉम्प्युटरची मदत यामुळे श्रम कमी झाले असले तरी यामुळे काही तोटेही झाले आहे.

या बदललेल्या जीवनशैलीमुळे काही आजार तयार झाले आणि काही आजार वाढलेही. अयोग्य जीवनशैलीमुळे होणारे आजार संसर्गजन्य नसले तरी मोठ्या प्रमाणात ही जीवनशैली स्वीकारल्यामुळे तिला बळी पडणाऱ्यांची संख्याही मोठी आहे.

अपुरी झोप, सर्वच गोष्टींचा वाढलेला ताण, बैठं काम, श्रमांची कमतरता, व्यायामाचा अभाव, दारू-तंबाखूजन्य पदार्थांचे अतिरेकी सेवन, मसालेदार आणि इंस्टंट पदार्थांचं सेवन आणि प्रक्रिया केलेलं पाकिटबंद खाण्यात झालेली वाढ यामुळे अनेक परिणाम शरीर-मनावर होत आहेत.

या सवयी अनेक आजार सोबत घेऊन येतात.

अनियमित रक्तदाब, हृदयरोग, लठ्ठपणा, मासिक पाळीविषयक आजार आणि अनियमितता, पोटाचे आजार, मधुमेह, फॅटी लिव्हर, गाऊट अशा आजारांमध्ये वाढझाल्याचं दिसतं.यापैकीच एका स्थितीची माहिती इथं घेणार आहोत. तो आजार म्हणजे मूळव्याध. बहुतांशवेळा भीड असल्यानं किंवा अज्ञानापोटी या आजाराकडं दुर्लक्ष होते.

मूळव्याध आणि गुदाशयाचा कर्करोग याबद्दल अनेक गैरसमज पसरलेले दिसतात. त्यामुळे त्याची माहिती नीट असणे आवश्यक आहे.मूळव्याध म्हणजे काय?
मूळव्याधाला इंग्रजीत ढ्ढते आणि पस्र्दिप्द्र् असे दोन शब्द वापरले जातात. आपल्या गुदद्वाराजवळील रत्कवाहिन्या जेव्हा फुगतात, त्यांना सूज येते तेव्हा हा त्रास सुरू होतो.

यामुळे शरीराच्या या भागात रक्तस्राव होणं, चिकट पदार्थ बाहेर पडणं, शौचाला गेल्यावर त्रास होणं, या भागात वेदना जाणवणं सुरू होतं. या रक्तवाहिन्यांची आणि तिथल्या स्नायूंची लवचिकता कमी झाल्यावर वेदना सुरू होतात.

मूळव्याधाची कारणं
मूळव्याधाच्या कारणांचा विचार केल्यास सर्वात आधी येतं ते कारण म्हणजे बद्धकोष्ठता.

मलत्यागामध्ये त्रास होणं, मलत्याग करण्यासाठी जोर लावावा लागणं. यामुळे या भागातल्या रक्तवाहिन्या सुजतात.

चेन्नईइथल्या एसआरएम ग्लोबल हॉस्पिटलमधील शस्त्रक्रिया विभागातील सीनियर कन्सल्टंट डॉ. एस. उदयम यांच्यामते काही दुर्बल जनुकांमुळेही हा आजार होतो.

'तंतुमय पदार्थ म्हणजे फायबर कमी खाणं, दीर्घकाळ बसून राहाणं, बैठं काम, गरोदरपणामुळे येणारा ताण, गुदाशयाचा कर्करोग यामुळेही हा त्रास होतो', असं डॉ. उदयम सांगतात.

मूळव्याध, फिशर आणि फिश्चुला यात काय फरक आहे?
ही तीन नावं अनेकदा आपण वाचलेली असतात. बऱ्याचदा लोक स्वतःच स्वतःच्या आजाराचं निदान करुन उपचार घ्यायला सुरुवात करतात. ही सवय घातक ठरू शकते.

मूळव्याधामध्ये गुदद्वाराजवळील रक्तवाहिन्यांना सूज येते. फिशर या आजारात गुदद्वाराला लहानशी चीर किंवा भेग पडते. यामुळे वेदना होतात आणि शौचाला गेले असताना रक्तही जाते.

फिश्चुला या आजारात गुदमार्ग आणि त्याच्याजवळील भागात एक मार्ग तयार होतो. त्वचेतून बाहेर पडणाऱ्या या छिद्रातून संसर्गामुळे सतत स्राव बाहेर पडत राहातो.याबद्दल चेन्नईच्या एमजीएम हेल्थकेअर रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर दीपक सुब्रमणियन यांनी अधिक माहिती दिली.

ते म्हणाले, 'पाइल्समध्ये वेदना आणि रक्तस्राव शक्यतो होत नाही. मात्र फिशरमध्ये वेदना आणि रक्तस्राव होतो. फिश्चुलामध्ये त्वचेतून चिकट स्राव तसेच रक्तमिश्रित स्राव बाहेर पडतो. ते सांगतात, याबरोबरच पेरिॲनल ॲबसेस नावाचाही एक आजार असतो.
यामध्ये गुदमार्गातील ग्रंथींमध्ये संसर्ग झाल्यामुळे हा त्रास होतो. यात गुदद्वाराजवळ सूज येते आणि ती वाढत जाते. यावर त्वरित उपचार केले नाहीत तर त्याचं रुपांतर फिश्चुलामध्ये होतं.'

'पेरिॲनल ॲबसेसमध्ये गुदद्वाराच्या आजूबाजूचा भाग लाल होतो, वेदना होऊ लागतात आणि सूजही जाणवते. यात पस साठल्यामुळे त्रास वाढतो.'

मूळव्याध आणि या आजारांवर उपचार काय?
डॉ. एस. उदयम यांनी यावरील उपचारांबद्दल अधिक माहिती दिली.

ते सांगतात, 'मूळव्याध पहिल्या टप्प्यामध्ये असेल तर आहारात बदल करुन, दररोज योग्य प्रमाणात पाणी पिऊन आणि उपचारांनी तो बरा होतो. दुसऱ्या टप्प्यामध्ये असेल तर रबर बँड लिगेशन, स्क्लेरोथेरपी, थर्मल कोग्युलेशन असे उपचार केले जातात.

या उपचारांनंतरही सूज गेली नाही तर शस्त्रक्रीया करावी लागते. तिसऱ्या टप्प्यामध्ये असणाऱ्या मूळव्याधावर रबर बँड लिगेशन किंवा शस्त्रक्रियेद्वारे उपचार होतात. चौथ्या टप्प्यात मात्र शस्त्रक्रीया हाच उपचार असतो.'

मूळव्याधाचा त्रास कमी करण्यासाठी काय कराल?
मूळव्याधाचा त्रास कमी करण्यासाठी आपल्या जीवनशैलीतला कोणता घटक यासाठी कारणीभूत आहे यावर लक्ष ठेवा आणि त्यात बदल करा असं डॉ. एस. उदयम सांगतात.

ते सांगतात, 'दीर्घकाळ एकाच जागी बसून राहाणं टाळा, शौचाला गेल्यावर तेथे जास्त वेळ काढू नका, मलत्यागाच्यावेळेस जोर देऊ नका. गुदद्वाराजवळील जागा स्वच्छ ठेवा. सिट्झ बाथ म्हणजे सोसवेल इतक्या गरम पाण्याचा शेक घ्या.

तुमच्या डॉक्टरांना विचारुन वेदनाशामक औषधं तसेच संसर्ग असलेल्या जागेवर लावण्यासाठी क्रिम घ्या. हे उपचार डॉक्टरांच्या मदतीनेच करायला हवेत.'डॉ. दीपक सुब्रमणियन सांगतात, 'बद्धकोष्ठता टाळण्यासाठी योग्य चौरस आहार घेणं आवश्यक आहे. भरपूर पाणी आणि तंतुमय पदार्थांचा समावेश आहारात केला पाहिजे.'

आपले पचन चांगले राहावे तसेच पोट व्यवस्थित साफ राहावे यासाठी दररोज प्रक्रीया न केलेल्या पदार्थांचा समावेश आपल्या आहारात असला पाहिजे. फळे, भाज्या, डाळी, सॅलड यांचा योग्य वापर केला पाहिजे. मसालेदार पदार्थ, कॉफी, अल्कोहोल बंद केल्यास मूळव्याधाची लक्षणंही दूर होतात.

डॉ. एस. उदयम योगासनं, चालण्यासारखा व्यायाम करायला सुचवतात. यामुळे शरीराची हालचाल होते आणि बद्धकोष्ठता टाळण्यासाठी उपयोग होतो असं ते सांगतात.

मात्र जड वजनं उचलण्याचा व्यायाम टाळावा अशी सूचना ते करतात.

बद्धकोष्ठता कशी टाळाल?
बद्धकोष्ठता हा त्रास बहुतेक सर्व वयोगटातल्या लोकांना होताना दिसून येतो. आपली जीवनशैली, आहारविहार यांच्यामुळे अनेक आजारांना सामोरं जावं लागत आहे.

त्यापैकीच बद्धकोष्ठ हा एक आजार आहे. पुन्हा बद्धकोष्ठ हा एकमेव आजार नसून यामुळे पुढे अनेक आजारांची सुरुवात होते.

त्यामुळे वेळीच त्याला थांबवणं गरजेचं आहे आणि बद्धकोष्ठाची स्थिती येऊ नये यासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे. याला बद्धकोष्ठ, मलावरोध अशाही संज्ञांनी ओळखलं जातं.पोटातील अन्न पचून ते वेळीच बाहेर पडत नसल्यास अनेक कारणं असू शकतात. त्यासाठी सर्वप्रथम आपल्या जीवनशैलीकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

बद्धकोष्ठाची काही लक्षणं पुढीलप्रमाणे

पुरेशा प्रमाणात पाणी आणि पातळ द्रव्यं आहारात नसणं
तंतूमय पदार्थ म्हणजे फायबर्स आहारात नसणं.फळं, भाज्या तसेच तृणधान्यांचा आहारात अभाव
सतत एकाजागेवर बसून राहाणं, व्यायाम किंवा हालचालीचा अभाव, बसून राहाण्याबरोबर सतत पडून राहाणं
शौचाला जाण्याच्या भावनेकडे लक्ष न देणं
ताणतणाव, चिंता तसेच नैराश्य
बद्धकोष्ठ दूर होण्यासाठी काही उपाय करणं गरजेचं आहे. सर्वात प्रथम म्हणजे आपल्या रोजच्या आहारात पाण्याचं प्रमाण वाढलं पाहिजे. तसेच तंतुमय पदार्थ म्हणजे फायबर्स मिळतील असे पदार्थ खाल्ले पाहिजेत. यात फळं, भाज्या, कठिण कवचाची फळं, पूर्ण तृणधान्य यांचा समावेश होतो.

आहारात अचानक फायबर्स वाढवणं त्रासदायक ठरू शकतं. काही लोकांना पोट फुगणं किंवा अस्वस्थ वाटू शकतं. त्यामुळे फायबर्सचं प्रमाण हळूहळू वाढवलं पाहिजे.

बद्धकोष्ठ होऊ नये किंवा बद्धकोष्ठ झालेल्या लोकांनी आपल्या शरीरातील बदलांचं निरीक्षण केलं पाहिजे. रोजचा ठराविक असा क्रम पाळण्याची गरज आहे. दारू पिणं टाळलं पाहिजे. शौचाला जाण्याची भावना झाल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये.कमोडवर शौचाला बसणाऱ्यांनी आपले पाय थोडे उंचावर होतील असे लहानसे स्टूल पायाखाली घ्यावे यामुळे शौचाची क्रिया सोपी होईल. दररोज थोडा व्यायाम, चालणं फिरणं ठेवल्यास पोट साफ होण्यास मदत होते.

बद्धकोष्ठतेचे वेळीच व्यवस्थापन केल्यास मूळव्याध आणि फिशरसारख्या गुंतागुंत टाळता येते. जांभूळ, सफरचंद, चिया सीड्स, गाजर आणि बीट यांसह फायबरयुक्त आहार, नियमित शारीरिक हालचाली आणि पुरेसे पाणी पिणे हे आतड्यांचे कार्य सुधारण्यास मदत करते.

मल विसर्जन करताना जास्त ताण देणे टाळा आणि प्रोबायोटिक्सचा आहारात समावेश केल्याने आतड्यांचे आरोग्य चांगले राखण्यास मदत होऊ शकते.

वेळेवर उपचार केल्याने दीर्घकालीन समस्या टाळता येते आणि मूळव्याध आणि गुदाशय आणि गुदद्वाराला भेगा पडणे यासारख्या गुंतागुंतीचा धोका कमी होतो.

तुमची विष्ठा तुमच्याबद्दल काय सांगते?
पचन झालेल्या तसेच ज्यातून पोषक घटक शोषून घेतले आहेत अशा अन्नातील टाकाऊ भाग म्हणजे विष्ठा. विष्ठेला शास्त्रीय भाषेत ेिमे म्हटलं जातं.

तुमच्या प्रकृतीची माहिती घेण्यासाठी तसेच आजाराचे निदान करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर्स तुमच्या विष्ठेचा आकार, रंग, वास, त्याचा पोत यांचा विचार करतात.

सामान्य प्रकारची विष्ठा ही मऊ, सॉसेजसारखी असते. किंवा सॉसेजसारख्या दंडाकृती विष्ठेवर भेगा असू शकतात.

सुटी सुटी किंवा कठीण खडे असल्यास तुम्ही पाणी कमी पित आहात असा अर्थ होतो.

अगदी मुलायम किंवा द्रवरुप शी असेल तर तुम्हाला डायरिया असण्याची तसेच कसला तरी संसर्ग झाला असण्याची शक्यता असते.

गुदाशयाचा कर्करोग म्हणजे काय?
आपल्या मोठ्या आतड्याच्या शेवटच्या काही इंचाच्या भागाला गुदाशय असं म्हणतात. गुदद्वाराला अगदी लागून हा भाग असतो.

गुदाशयात अनियमित आणि अनियंत्रित पद्धतीनं उतींची वाढ झाली की तिथं घट्ट गाठीसारखा भाग तयार होतो. या कॅन्सरमध्ये हेच दिसून येतं. या कॅन्सरची जागा अत्यंत नाजूक ठिकाणी असल्यामुळे तसेच त्याच्याआजूबाजूला महत्त्वाचे अवयव असल्यामुळे त्यावर उपचार करणं फार आव्हानात्मक होऊन जातं.याबद्दल अधिक माहिती मुंबईतील कोकिलाबेन धीरुभाई अंबानी रुग्णालयातील जनरल लॅप्रोस्कोपिक आणि कोलोरेक्टल सर्जन डॉ. मनोज मूलचंदानी यांनी दिली.

ते म्हणाले, 'गुदाशयाचा कॅन्सर हा एक कोलोरेक्टल कॅन्सर आहे. अमेरिकेत निदान करण्यात येणाऱ्या कॅन्सरमध्ये तिसरा सर्वात मोठा कॅन्सर आहे. ते सांगतात, कोलोरेक्टल कॅन्सरपैकी ४० टक्के प्रमाण या कॅन्सरचं असतं.

यापैकी बहुतांश रुग्णांमध्ये सिगारेट ओढणं, चुकीची आहार पद्धती, दारू पिणं, व्यायामाचा अभाव, लठ्ठपणा या गोष्टी दिसल्याचं ते सांगतात. भारतामध्येही गेल्या दशकभरापासून पन्नाशी उलटललेल्या आणि पन्नाशीच्या आतल्याही लोकांमध्ये या आजाराचं प्रमाण वाढताना दिसत आहे. योग्य वेळेत निदान, उपचार केले तर यामुळे होणारे मृत्यू टाळता येतील.'

मूळव्याध आणि गुदाशयाचा कॅन्सर यात काय फरक आहे?
मूळव्याध आणि गुदाशयाच्या कॅन्सरमध्ये कधीकधी गल्लत होण्याची शक्यता असते. हे आजार वेगवेगळे आहेत. मूळव्याधात गुदद्वाराच्या रक्तवाहिन्यांना सूज येते.मात्र गुदाशयाच्या कॅन्सरमध्ये घट्टसर गाठ असते आणि ती पसरत जाते. मात्र योग्यवेळी निदान न झाल्यास याचा त्रास वाढतो. सुरुवातीच्या काळातच त्याची तपासणी आणि निदान होणं आवश्यक आहे.

गुदाशयाच्या कर्करोगाची लक्षणं
गुदाशयाच्या कॅन्सरच्या लक्षणांबाबत नवी मुंबईच्या अपोलो हॉस्पिटल येथे कार्यरत असणारे कॅन्सरतज्ज्ञ डॉ. राजेश शिंदे यांनी अधिक माहिती दिली.

ते सांगतात, 'गुदाशयातून रक्तस्राव होणं, शौचामधून रक्त पडणं. मलत्यागाच्या सवयीत बदल होणं, कधी बद्धकोष्ठता तर कधी डायरिया असे बदल होणं. विष्ठेचा आकार बारीक होणं, अचानक कोणत्याही कारणाविना वजन कमी होणं. दमल्यासारखं वाटणं, दौर्बल्य अशी लक्षणं दिसणं. पोट साफ झाल्याशिवाय बरं वाटणार नाही असं वाचत राहाणं, पोटात सतत हालचाल सुरू आहे असं वाटणं, गुदद्वाराजवळ दुखणं अशी लक्षणं दिसतात.'डॉ. राजेश शिंदे सांगतात, 'सुरुवातीची लक्षणं सौम्य असू शकतात किंवा ती मूळव्याधाची आहेत असं वाटू शकतं. मात्र यासाठीच योग्यवेळेत तपासणी व निदान होणं आवश्यक आहे.'

डॉ. शिंदे सांगतात, 'या कॅन्सरचं निदान करण्यासाठी रुग्णालयात तपासणी करणं आवश्यक आहे. यात डिजिटल रेक्टल एक्झामचा समावेश असतो. गुदाशयाची कोलोनोस्कोपी केली जाते तसेच तेथील उती तपासणीसाठी काढली जातात.

याशिवाय एमआरआय, सीटी स्कॅन, अल्ट्रासाऊंड या साधनांचा वापर केला जातो. तसेच रक्ताची चाचणीही करावी लागते. यामधून कॅन्सरचं प्रमाण किती आहे, तो किती पसरला आहे याचीही माहिती तज्ज्ञ डॉक्टर घेतात.'गुदाशयाच्या कॅन्सरवर उपचारया कॅन्सरचे उपचार तो कोणत्या टप्प्यावर आहे आणि कोठे आहे यानुसार बदलतात. शस्त्रक्रीया करणं, रेडिएशन, केमोथेरपी असे अनेक उपचार करण्याचा निणय डॉक्टर तपासणी करुन घेतात.

हा कॅन्सर पसरू शकतो. डॉ. मनोज मूलचंदानी सांगतात, 'हा कॅन्सर पसरला तर लसिका ग्रंथी म्हणजे लिंफनोड्सवर परिणाम होतो. यकृत, फुफ्फुसं, पोटातल्या आतल्या अस्तरावरही त्याचा परिणाम होतो.

या टप्प्यावर लक्षणं नियंत्रित करणं यासाठी उपचार करावे लागतात. केमोथेरपी, लक्ष्यित म्हणजे टारगेटेड थेरपी यांचा यात समावेश असतो. काही केसेसमध्ये यकृत किंवा फुफ्फुसावर शस्त्रक्रीयाही करावी लागते.'डॉ. मूलचंदानी सांगतात, 'रेक्टल कॅन्सर हा जीवावर बेतू शकतो. पण योग्यवेळेस म्हणजे सुरुवातीलाच त्याचं निदान झालं तर त्यावर उपचार करता येतात. मूळव्याध आणि हा कॅन्सर यातला फरक ओळखणं हा महत्त्वाचा भाग आहे.'

'गुदद्वारातून रक्त येणं, पचनामध्ये बिघाड होणं, कोणत्याही कारणाविना वजन कमी होणं अशी लक्षणं दिसल्यास योग्य वैद्यकीय सल्ला घेणं गरजेचं आहे. पन्नाशी उलटल्यावर आरोग्याची नियमित तपासणी करुन घेणं आवश्यक आहे आणि कॅन्सरबद्दल जागरुकरता निर्माण करणं गरजेचं आहे.'

जीवनशैलीमध्ये कोणताही महत्त्वाचा बदल करायचा असेल, आहारात बदल करायचा असेल तसेच शारीरिक व्यायामाची सुरुवात करायची असेल तर डॉक्टरांचा आणि योग्य प्रशिक्षकांची मदत घेणं आवश्यक आहे.

आपल्या शरीराची तसेच लक्षणांची योग्य तपासणी डॉक्टरांकडून करुन घेऊन त्यांच्या सल्ल्यानेच जीवनशैलीत बदल करणं योग्य आहे.

# मोबाइल टॉवर बॅटरी चोरीप्रकरणी तिघांना अटक; पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेची धडाकेबाज कामगिरी



नालासोपारा : मोबाइल फोन टॉवरमध्ये बसविलेल्या बॅटऱ्यांची चोरी करणाऱ्या टोळीचा पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेने छडा लावत तिघांना अटक केली आहे. इंडस कंपनीच्या पेल्हार डॅम परिसरातील टॉवरमधून ५० हजार रुपये किमतीच्या २४ बॅटऱ्या २३ नोव्हेंबरला पहाटे चोरीस गेल्या होत्या. या प्रकरणी फिल्ड ऑफिसर अनुराग शर्मा (२२) यांनी २९ नोव्हेंबरला पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन कांबळे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेला तपासाच्या सूचना दिल्या. सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश वाघचौरे, पोलिस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे यांच्या पथकाने तपास सुरू करताच गुन्ह्यात वापरलेली पिकअप जीप व त्यासंबंधी माहिती मिळविण्यात आली. त्यानुसार आरोपी हे मोबाइल टॉवरसंबंधित एआरसी कंपनीत कार्यरत असल्याचे उघड झाले.या माहितीच्या आधारे पेल्हार पोलिसांनी औरंगजेब सरवर अन्सारी (१९), परवेज गुलाम रसुल शहा (२४) आणि रफिक अमिनसाब शेख (३८) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली जीप, चार बॅटऱ्या आणि ४९,५०० रुपये रोख अशी मालमत्ता जप्त करण्यात आली. तसेच मांडवी येथे दाखल असलेल्या दुसऱ्या गुन्ह्यातील ५२ हजारांच्या १३ बॅटऱ्याही हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. एकूण ६ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.या कारवाईत सहाय्यक फौजदार योगेश देशमुख, पोलिस हवालदार तानाजी चव्हाण, वाल्मीक पाटील, अभिजित नेवारे, रवी वानखेडे, अशोक परजणे, अनिल वाघमारे, वसिम शेख आणि अमोल मस्से यांनी सहभाग घेतला.

# अर्नाळ्यात अवैध हातभट्टीवर धाड; दोन हजार लिटरहून अधिक रसायन नष्ट

विरार, प्रतिनिधी — विरार (पश्चिम) परिसरातील अर्नाळा-बंदरपाडा येथे सुरू असलेल्या अवैध हातभट्टी व्यवसायावर गुरुवारी गुन्हे शाखा युनिट-३च्या पथकाने कारवाई करत मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल नष्ट केला. पत्र्याच्या शेडमध्ये गावठी दारू निर्मितीसाठी साठवलेले सुमारे २,३५० लिटर रसायन (वॉश) आणि ४ लिटर तयार दारू असा मिळून १ लाख ७ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जागीच उद्ध्वस्त करण्यात आला.गुन्हे शाखेच्या पथकाला हवालदार मुकेश तटकरे यांना मिळालेल्या माहितीनुसार, बंदरपाडा परिसरात हातभट्टी दारू तयार केली जात असल्याची गोपनीय खबर मिळाली होती. त्यानंतर परिसरात पेट्रोलिंग वाढवून पथकाने परिसरावर छापा टाकला. तपासात सदर हातभट्टी अरुणा नाईक या महिलेची असल्याचे स्पष्ट झाले असून तिच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कारवाई पथकात होते—पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलिस निरीक्षक सुहास कांबळे, सहाय्यक फौजदार शिवाजी पाटील, हवालदार मुकेश तटकरे, गोविंद केंद्रे, सागर बारवकर, प्रशांत पाटील, राकेश पवार, इंद्रनील पाटील, सुनील पाटील, युवराज वाघमोडे, दत्तात्रय जाधव, आतिश पवार, तुषार दळवी आणि मनोहर तारडे यांनी सहभाग घेतला.स्थानिक परिसरात अवैध दारू निर्मिती रोखण्यासाठी पोलिसांनी पुढील गस्त आणि तपास अधिक कडक करण्याचा इशारा दिला आहे.







# अवैध प्रवासी वाहतूकप्रकरणी रॅपिडोविरुद्ध गुन्हा



नालासोपारा : वसई–विरार परिसरात कोणतीही वैध परवानगी न घेता खासगी दुचाकींमार्फत प्रवासी वाहतूक केल्याप्रकरणी रॅपिडो ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या ॲप कंपनीविरुद्ध विरार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपप्रादेशिक परिवहन विभाग, वसई यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली.मोटार वाहन निरीक्षक सचिन काशिनाथ कोतकर यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, ऑक्टोबर २०२५ पासून रॅपिडो कंपनी परवानगी न घेता दुचाकीमार्फत प्रवासी सेवा पुरवत असल्याचे आढळून आले. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी दीपक उगले यांच्या निर्देशानुसार तपास करण्यात आला. मोटार वाहन कायद्यानुसार ॲप-आधारित प्रवासी वाहतुकीसाठी शासनाची परवानगी बंधनकारक असून, खासगी वाहनांचा व्यावसायिक वापर करण्यास स्पष्ट मनाई आहे.उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या तपासात, रॅपिडो ॲपच्या माध्यमातून खासगी दुचाकींवर प्रवासी वाहतूक सुरू असल्याचे निष्पन्न झाले. सेवेत कार्यरत चालकांची चारित्र्य पडताळणी तसेच सुरक्षा तपासणी करण्यात न आल्याने महिला प्रवासी व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.राज्य सरकारने अद्याप रॅपिडोला बाइक-टॅक्सी श्रेणीतील कोणताही परवाना, लायसन्स किंवा मान्यता न दिल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तरीही कंपनीने वसई–विरार परिसरात विनापरवानगी ऑनलाइन सेवा सुरू ठेवून आर्थिक लाभ घेतल्याचा आरोप परिवहन विभागाने केला आहे.या सर्व घडामोडींनंतर विरार पोलिस ठाण्यात रॅपिडो कंपनीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# गांजासह आरोपीला पेल्हार पोलिसांची अटक

नालासोपारा : वसईतील नवजीवन–शांतीनगर परिसरातील सावळा कम्पाउंड भागात पेल्हार पोलिसांनी गस्तीदरम्यान एका तरुणाला गांजासह ताब्यात घेतले. पोलिस निरीक्षक शिवाजी पाटील, सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश वाघचौरे, पोलिस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे आणि पथक गस्त घालत असताना हा प्रकार घडला.

पोलिसांनी संशयिताच्या हालचालीवरून त्याचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडे ३९ हजार ५२० रुपये किमतीचा गांजा आढळून आला. अजय विजयराज यादव (वय २०) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव असून, त्याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार पेल्हार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पेल्हार पोलीस करीत आहेत.

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय– ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मं. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in